# <u>सिकलसेल तपासणी व मार्गदर्शन केंद्र</u>

## श्री.व.ना.शा.वैद्यकीय,महाविद्यालय व रुग्णालय,यवतमाळ

**सिकलसेल तपासणी व मार्गदर्शन केंद्र सन 2004 पासुन सुरु करण्यात आलेले आहे, त्या अंतर्गत आता पर्यंत एकुन 69769 रुग्णांची नोदणी व तपासणी करण्यात आलेली आहे, त्यापैकी AS संक्रमीत रुग्ण 3623 असुन, SS संक्रमीत रुग्ण 2098 आहेत तसेच ईतर आजार असलेले रुग्णांमध्ये 585 रुग्ण ( abnormal Hb ) ग्रसित आढळुन आलेले आहे.**

**सिकलसेल रुग्णांना खालील सवलती देण्यात येतात**

1) सिकलसेल रुग्ण म्हणजे HB-SS किंवा HB-AS आजार असलेले रुग्ण होय.
2) सिकलसेल (speciality) ओपीडी दर मंगळवारी विकृती शास्त्र विभागात 200 रुम नंबर मध्ये सुरु राहते.
3) सिकलसेल आजाराकरिता रक्त तपासणी मोफ़त केल्या जाते.
4) सिकलसेल रुग्णांचे निदान व ऊपचार विनामुल्य केल्या जाते.
5) नियमित सिकलसेल जनजागरण शिबिरे घेऊन या आजारा बाबत जनजागृती करण्यात येते.
6) सिकलसेल ग्रस्त रुग्णांना राज्य रक्तसंक्रमण परिषदे तर्फ़े ओळख पत्र तयार करुन दिले जाते.
7) सिकलसेल रुग्णांना बदली रक्तदाता न घेता विना मुल्य रक्तपुरवठा करण्यात येते.
8) सिकलसेल ओपीडी मध्ये रुग्ण व त्यांचे नातेवाईकांना समुपदेशन व मार्गदर्शन करण्यात येते.

9) सिकलसेल रुग्णांना संजय गांधी निराधार योजने अंतर्गत 600/- रुपये प्रती महिना आर्थिक मदत दिल्या जाते.

10) सिकलसेल रुग्णांना आवश्यकता पडल्यास HIP JOINT Replacement शस्त्रक्रीये करिता शासनाकडुन आर्थिक मदत दिल्या जाते.

11) सिकलसेल वाहक गर्भवती (ANC) स्त्रीयांना गरज असल्यास गर्भजल परीक्षणासाठी पाठविण्यात येते.

12) एस.टी. बसेस च्या पास बनविण्याकरिता शासनाकडुन सवलत देण्यात येते.